# निवासी संशोधक पाठ्यवृत्ती

## (Residence Researcher Fellowship)

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी ही संस्था सामाजिक व राजकीय क्षेत्रात प्रशिक्षण, प्रबोधन व संशोधन या त्रिसूत्रीवर काम करते. विविध विषयांवर अभ्यास करणाऱ्या व्यक्तींना प्रोत्साहन देण्यासाठी प्रबोधिनीच्या वतीने निवासी संशोधक पाठ्यवृत्ती सुरु करण्यात आली आहे.

### १. खालील क्षेत्रातील व्यक्ती ह्या योजनेचा लाभ घेऊ शकतात.

१.१ पी.एच.डी. चा अभ्यास करणारे संशोधक.

१.२ समाजोपयोगी विषयांवर पुस्तक लिहिणारे लेखक, पत्रकार, कार्यकर्ते.

१.३ राजकीय व सामाजिक विषयांवरील अभ्यासक.

१.४ विशिष्ट विषयाचा अभ्यास करणारे अभ्यासक.

### २. निवासी संशोधक पाठ्यवृत्तीसाठी खालील प्रमाणे प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे.

२.१.सदर पाठ्यवृत्तीसाठीचा अर्ज हा संस्थेच्या चंचल स्मृती येथील नोंदणीकृत कार्यालय, ज्ञान नैपुण्य केंद्र उत्तन व www.rmponweb.org या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. संशोधक योजनेचा अर्ज प्राप्त करुन तो भरुन संस्थेकडे पाठविणे.

२.२.प्रबोधिनीच्या कार्यालयात अर्ज पाठवल्यानंतर प्रबोधिनी त्यावर विचार करुन संशोधकाला ई-मेल अथवा दूरध्वनीद्वारे संपर्क साधून पाठ्यवृत्ती मंजूर झाल्याची माहिती कळविण्यात येईल.

२.३.संशोधकाला संशोधनाच्या कालावधीत भोजनासाठी लागणारी (२५०/- रु प्रती दिन याप्रमाणे ) रक्कम आगाऊ भरावी लागेल.

२.४.संशोधकाला संशोधनासाठी एकावेळी जास्तीत जास्त १० दिवसांचा कालावधी दिला जाईल. त्यापेक्षा जास्त दिवसांची आवश्यकता भासल्यास वाढीव कालावधीच्या बाबतीत निर्णय घेण्याचा अधिकार व्यवस्थापनाचा असेल.

### ३. संशोधकांसाठी मार्गदर्शन :

संशोधक व अभ्यासक यांना प्रबोधिनीच्या उत्तन येथील संकुलाची माहिती मिळावी व त्यांना संकुलाचा वापर सुखकर व्हावा यासाठी खालीलप्रमाणे मार्गदर्शनपर माहिती.

संपर्काकरिता : **दिलीप नवेले,** ग्रंथपाल, E-mail : dilipn@rmponweb.org

- संकुलाचा पत्ता: (ज्ञान- नैपुण्य केंद्र)
  रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी, केशव सृष्टी, एस्सेल वर्ल्ड रोड, उत्तन, भाईंदर (पश्चिम), जि. ठाणे - ४०११०६
  दूरध्वनी क्र.: २८४५०१०१/०२/०३, फॅक्स : २८४५०१०६ वेबसाईट : http://www.rmponweb.org
  ई-मेल : samparka@rmponweb.org

- नोंदणीकृत कार्यालय:
  १७, चंचल स्मृती, ग.द.आंबेकर मार्ग, श्रीराम इंडस्ट्रीयल ईस्टेटच्या समोर, वडाला, मुंबई - ४०० ०३१.
  दूरध्वनी क्र.: ०२२-२४१८५५०२/२४१३६९६६. फॅक्स : ०२२-२४१५६७२५

## ३.१.संशोधकांसाठी उपलब्ध असणाऱ्या सोयी-सुविधा:

- निवास व्यवस्था - संशोधकांसाठी व अभ्यासकांसाठी प्रबोधिनीची उत्तन येथील निवासी संकुलातील निवास व्यवसथा ही विनामूल्य देण्यात येते.
- ग्रंथालय सुविधा - संकुलात निवास असेल त्यावेळी संशोधकांना प्रबोधिनीच्या ग्रंथालयाचा लाभ कार्यालयीन वेळेत (सकाळी १०.०० ते सायं.०६.००) घेता येईल.
- इंटरनेट सुविधा- प्रशासकीय वेळेमध्ये सशुल्क इंटरनेट सुविधा वापरता येईल.(सकाळी १०.०० ते सायं.०६.००)
- संगणक सुविधा - प्रशासकीय वेळेमध्ये संकुलाच्या संगणक कक्षातील संगणक हा विनामूल्य वापरता येईल मात्र प्रिंट आऊट, झेरॉक्स प्रतीसाठी शुल्क आकारण्यात येईल.सामान्यपणे कार्यालयीन वेळेनंतर सदर सेवा हवी असल्यास त्याची पूर्वसूचना संबंधित अधिकाऱ्यांकडे द्यावी.
- भोजन सुविधा - संशोधकांसाठी भोजन व्यवस्था ही सशुल्क असेल. त्यामध्ये खालीलप्रमाणे सुविधा उपलब्ध होईल.
- खालील सुविधेसाठी दिवसाला रु. २५०/- प्रमाणे आहारशुल्क असेल.

| स्थान | वेळ | व्यवस्था |
|---|---|---|
| शबरी भोजन कक्ष | सकाळी ०८.३० ते ०९.३० | चहा व न्याहारी |
| शबरी भोजन कक्ष | दुपारी ०१.०० ते ०२.०० | भोजन |
| शबरी भोजन कक्ष | रात्री ०८.३० ते ०९.३० | भोजन |

- वाहन सुविधा: संस्थेचे वाहन व वाहनचालक उपलब्ध असेल त्यावेळी व संस्थेच्या कामात अडचण येणार नसेल त्यावेळी संशोधकाने मागितल्यास भाईंदरपर्यंत सशुल्क वाहन उपलब्ध करुन देता येईल व संस्थेच्या नियमानुसार त्याचे शुल्क द्यावे लागेल.
- इतर माहितीकरिता : संस्थेच्या आवारात कुठल्याही माहितीकरिता संशोधक /अभ्यासक यांनी वरिष्ठ कार्यकारी अधिकारी /अभ्यागत संपर्क अधिकारी / संकुल सेवा अधिकारी / ग्रंथपाल यापैकी कुणाशीही संपर्क साधावा.

## ४. संशोधकाकडून संस्थेच्या अपेक्षा:

४.१.प्रबोधिनीच्या नियमानुसार संशोधक/अभ्यासक यांना संस्थेच्या आवारात प्रबोधिनीकडून मिळालेले ओळखपत्र गळ्यात घालून कायम वावरावे लागेल.

४.२.संशोधकाने संस्थेने ठरवून दिलेल्या वेळेत नाश्ता व जेवण घेणे अपेक्षित आहे. संकुल नागरी वस्तीपासून दूर असल्याने ही वेळ न पाळल्यास संशोधकाची गैरसोय होऊ शकेल.

४.३.संशोधक / अभ्यासक यांनी संस्थेचे संकुल सोडण्यापूर्वी अभ्यागत संपर्क अधिकारी / संकुल सेवा अधिकारी / ग्रंथपाल यांचेशी संपर्क साधून सशुल्क व्यवस्थेचे शुल्क त्यांचेकडे देऊन पावती घ्यावी.

४.४.प्रबोधिनीचे नियम व संकुलाचा भंग होणार नाही अशी दक्षता अभ्यासकाने कृपया घ्यावी.

४.५.संकुलातील कक्षामध्ये कोणत्याही प्रकारची सेवा (Room Service) मिळणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

४.६.अभ्यासकाने अर्जासोबत आपले छायाचित्र (फोटो) जोडावे.

४.७.संशोधक / अभ्यासक यांस अभ्यासक्रम कालावधी पूर्ण झाल्यानंतर प्रबोधिनीकडून **"निवासी संशोधक पाठ्यवृत्ती"** प्रमाणपत्र देण्यात येईल.